RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ८, अंक ३२] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट १८-२४, २०२२/ श्रावण २७-भाद्रपद २, शके १९४४ [पृष्ठ १ , किंमत : रुपये १५.००

**प्राधिकृत प्रकाशन**

**संकीर्ण सूचना व जाहिराती**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वाशिम विभाग, वाशिम**

दिनांक ७ एप्रिल २०२२.

जा.क्र./४५३/२०२२

**चौकशी जाहीर नोटीस**

(परिशिष्ट XXIIIA)

**चौ. क्र.४३४९/२०१७ (कलम-किरकोळ)**

सर्व सबंधित नागरिकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सहायक संस्था निबंधक, तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वाशिम विभाग, वाशिम यांचे कार्यालयास दिनांक २४ जानेवारी २०१४ रोजी आग लागल्यामुळे श्री महादेव जागेश्वर संस्थान, कार्ली, ता.जि. वाशिम जुना नोंदणी क्रमांक ऐ-९१४ (अकोला), नवीन नोंदणी क्रमांक ऐ-२१६ (वाशिम) या संस्थेच्या प्रकरणाचे अभिलेखाचे आगीत नुकसान झाल्यामुळे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ७९ अअ प्रमाणे श्री. वसंतराव गोविंदा मार्गे, यांनी या न्यासाचे बदल अर्ज चौ.क्र. ९५५/२०१० व आदेशाच्या प्रतीचे पुनर्गठित करण्याकरिता अर्ज सादर केला आहे.

सर्व संबंधित नागरिकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, वाशिम विभाग, वाशिम हे वरील नमूद केलेल्या न्यासाच्या संबंधी व वर नमूद केलेल्या अभिलेखासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ७९ अ अ अन्वये रेकॉर्ड पुनर्गठित करणेकामी चौकशी करीत आहेत. तरी सदर जाहिरात प्रसिद्धीनंतर सदर संस्थेच्या रेकॉर्ड पुनर्गठित करण्याबाबत कोणाला काही हरकत/आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या कार्यलयात अर्जदाराने सादर केलेल्या रेकॉर्डचे निरिक्षण करून व त्या कागदपत्रांना हरकत असल्यास त्यांनी त्यांचेकडे असलेल्या योग्य त्या कागदपत्रांसह लेखी आक्षेप नोंदवावा. सदर तारखेनंतर प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप विचारात घेतले जाणार नाही. तदनंतर सदर संस्थेचे/न्यासाचे प्राप्त झालेले उपरोक्त कागदपत्र हे मूळ रेकॉर्ड म्हणून अंतिम व कायम करण्यात येतील. ही नोटीस माझ्या सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, वाशिम विभाग, वाशिम यांच्या शिक्क्यानिशी आज दिनांक ७ एप्रिल २०२२ रोजी दिली.

ठिकाण : वाशिम,
दिनांक : ७ एप्रिल २०२२.

**आर. डी. मडावी,**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
वाशिम.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.